Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… Date: 29/08/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या... **आपलं महानगर** My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## हॉकीचे जादूगार ध्यानचंद कुशवाहा



ध्यानचंद सिंग कुशवाहा हे भारतीय हॉकीचे नावाजलेले खेळाडू होते. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांचे मोठे भाऊ रूपसिंग हेसुद्धा हॉकीचे खेळाडू होते. ध्यानचंद यांचे वडील सामेश्वर दत्त सिंग हे ब्रिटिश सैन्यात होते. तेसुद्धा सैन्यात हॉकी खेळायचे. अशाप्रकारे ध्यानचंद यांना हॉकीचे बाळकडू लहानपणापासूनच मिळाले. त्यांना जागतिक खेळ विश्वातील सर्वोत्कृष्ट हॉकीचे खेळाडू म्हणून ओळखले जाते. त्यांना हॉकीचे जादूगार म्हणून संबोधले जायचे. त्यांनी भारताला १९२८, १९३२ व १९३६ मध्ये ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक मिळवून दिले. त्यांच्या काळात भारतीय संघ सर्वात शक्तिशाली संघ म्हणून ओळखला जायचा. ध्यानचंद यांनी आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना १९४८ साली खेळला. त्यांनी दिलेल्या योगदानाचा प्रभाव इतका जबरदस्त होता की भारताने १९२८ ते १९६४ दरम्यान झालेल्या ८ ऑलिम्पिक स्पर्धेपैकी ७ स्पर्धांमध्ये सुवर्ण पदकाला गवसणी घातली. जर्मनी संघाला १९३६ मध्ये ८-१ ने नमवल्यानंतर, त्यांच्या खेळाने प्रभावित होऊन हिटलरने त्यांना आपल्या सैन्यात वरिष्ठ पदाची ऑफर दिली होती जी त्यांनी नाकारली.

ध्यानचंद यांनी आपल्या आंतराष्ट्रीय काराकीर्दीत ५८० गोल केले. हे गोल हॉकीच्या इतिहासात एका खेळाडूने केलेले सर्वाधिक गोल्स आहेत. भारत सरकारने १९५६ साली त्यांचा पद्मभूषण या पुरस्काराने सन्मान केला. त्यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी देण्यात येणाऱ्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार असे केले आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी सर्व लोक जमतात आणि राष्ट्रीय क्रीडा दिन उत्सव यशस्वी करतात. ३ डिसेंबर १९७९ रोजी ध्यानचंद यांचे निधन झाले.

Nashik Edition
Aug 29, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

Jagdamba Education Society's SND POLYTECHNIC KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTANDING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401